## BOMBAY ACT No LXIII OF 1959.

### AN ACT TO REPEAL CERTAIN ENACTMENTS AND TO AMEND CERTAIN OTHER ENACTMENTS.

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर, " मुंबई राजपत्रांत " दिनांक २९ ऑक्टोबर १९५९ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला ].

### विवक्षित अधिनियम रद्द करण्याबाबत आणि इतर विवक्षित अधिनियम सुधारण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, जे अधिनियम अंमलांत असण्याचें बंद झाले आहेत किंवा अनावश्यक किंवा अप्रचलित झाले आहेत असे विवक्षित अधिनियम यांत पुढें दिलेल्या कारणांसाठीं रद्द करणें आणि इतर विवक्षित अधिनियम सुधारणें इष्ट आहे; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षीं याद्वारें पुढील प्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास मुंबईचा (अधिनियम) रद्द करण्याबाबत व सुधारण्याबाबत अधिनियम, १९५९ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. यथास्थिति मुंबई राज्यास किंवा त्याच्या कोणत्याहि भागांस लागू केलेले, पहिल्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेले अधिनियम, त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभांत उल्लेख केलेल्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीनें याद्वारें रद्द करण्यांत येत आहेत. विवक्षित अधिनियम रद्द करणें.

३. यांस जोडलेल्या दुसऱ्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेले अधिनियम, त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभांत उल्लेख केलेल्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीनें, याद्वारें सुधारण्यांत येत आहेत. विवक्षित अधिनियमांची सुधारणा.

४. (१) या अधिनियमान्वयें कोणताहि अधिनियम रद्द केल्यामुळें, त्याचा, ज्या कोणत्याहि इतर अधिनियमांत तो लागू करण्यांत आला असेल, तो समाविष्ट करण्यांत आला असेल किंवा त्याचा उल्लेख करण्यांत आला असेल त्यावर परिणाम होणार नाहीं; बचाव व अर्थ लावणें.

आणि या अधिनियमामुळें, अगोदरच केलेली किंवा करू दिलेली कोणतीहि गोष्ट किंवा अगोदरच संपादन केलेला कोणताहि हक्क किंवा मालकी हक्क प्राप्त झालेलें कोणतेंहि बंधन किंवा पत्करलेली जबाबदारी, किंवा त्यासंबंधांतील कोणतीहि उपाययोजना किंवा कामकाज, किंवा कोणतेंहि कर्ज, शिक्षा, बंधन, जबाबदारी, दावा किंवा मागणी यांत दिलेली सूट किंवा केलेली मुक्तता किंवा अगोदरच दिलेली कोणतीहि हमी किंवा पूर्वींच्या कोणत्याहि कृत्याचा किंवा गोष्टीचा पुरावा याची वैधता, अवैधता, किंवा परिणाम यांस बाध येणार नाहीं.

तसेंच या अधिनियमामुळें विधीचें कोणतेंहि तत्त्व किंवा नियम किंवा प्रस्थापित क्षेत्राधिकार, वाद, प्रतिवादाचें स्वरूप किंवा त्याचा क्रम, प्रथा किंवा कार्यरीति किंवा प्रचलित रिवाज, रूढि, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, पद किंवा नेमणूक या गोष्टींस बाध येणार नाहीं. मग, त्या गोष्टी अनुक्रमें याद्वारें रद्द केलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें संमत केलेल्या असल्या किंवा त्यांस अशा अधिनियमांत मान्यता मिळालेली असली किंवा त्या अशा अधिनियमांतून निष्पन्न झालेल्या असल्या तरी हरकत नाहीं.

पुरंतु, या अधिनियमान्वयें कोणताहि अधिनियम रद्द केल्यामुळें, सध्या अस्तित्वांत किंवा अंमलांत नसलेला कोणताहि क्षेत्राधिकार, पद, रूढि, जबाबदारी, हक्क, मालकी हक्क, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, रिवाज, प्रथा, कार्यरीति किंवा इतर बाब किंवा गोष्ट पुन्हा अस्तित्वांत किंवा अंमलांत येणार नाहीं.

आणखी असें कीं, सौराष्ट्राचा शिक्याबाबत अधिनियम, १९५० हा रद्द झाल्यामुळें, सौराष्ट्र सरकारचें अभिधान असणाऱ्या व त्या अधिनियमान्वयें वैध व प्रभावी आहे असें समजण्यांत येणाऱ्या शिक्यानें सीलबंद केलेल्या कोणत्याहि लेखास किंवा कागदपत्रास बाध येणार नाहीं.

(२) मुंबईचा मोटार वाहन कर आणि मोटार वाहन (सुधारणा) अधिनियम, १९५६ हा प्रस्तुत अधिनियमान्वयें रद्द केला असला तरीहि, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यांतील किंवा मुंबई मोटार वाहन अधिनियम, १९३९ यांतील किंवा वरील शेवटच्या दोन अधिनियमांपैकीं कोणत्याहि अधिनियमान्वयें काढलेला किंवा काढल्याचें समजण्यांत येतें असा व तत्कालीं अंमलांत असलेला कोणताहि नियम, अधिसूचना किंवा आदेश यांतील किंवा कोणत्याहि इतर लेखांतील किंवा कागदपत्रांतील राज्य वाहतूक अधिकारी यांचा किंवा राज्य मोटार वाहतूक अधिकारी यांचा कोणताहि उल्लेख हा वाहतूक संचालकाचा उल्लेख असल्याप्रमाणें त्याचा अर्थ लावला पाहिजे.

## पहिली अनुसूचि.

### रद्द केलेले अधिनियम.

(कलम २ पहा.)

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | जेथवर रद्द करण्यांत आला ती मर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | **१. केंद्रीय अधिनियम.** | |
| १८७८ | १ | (दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश खेरीज करून) पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास लागू असलेला अफूबाबत अधिनियम, १८७८ ... ... ... | सबंध. |
| | | **२. मुंबई अधिनियम.** | |
| १८२७ | विनियम १२. | मुंबईच्या अधीन असलेल्या जिल्ह्यांत सर्वत्र पोलिस पद्धति स्थापन करण्याबाबत, ती अंमलांत आणण्यासाठीं नियमांची तरतूद करण्याबाबत, आणि सर्व पोलीस अधिकारी व सेवक यांचीं कर्तव्यें व अधिकार ठरविण्याबाबत विनियम. | सबंध. |
| १८२७ | विनियम १३. | फौजदारी न्यायालयांची रचना आणि त्यांचीं कामें व कामकाज ठरविण्याबाबत विनियम. | सबंध. |
| १९५६ | १५ | मुंबईचा मोटार वाहन कर आणि मोटार वाहन (सुधारणा) अधिनियम, १९५६. | सबंध. |

अनुसूचि—चालू.

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | जेथवर रद्द करण्यांत आला ती मर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | ३. हैदराबाद अधिनियम. | |
| १३१४ फसली. | १ | साक्षीदारांस बोलावण्यासाठीं अधिकार देण्याबाबत अधिनियम. | सबंध. |
| १३५० फसली. | २१ | मुलकी नसलेल्या वेश्या व कलावंतिणींबाबत अधिनियम. | जेवढा रद्द केला नसेल तेवढा. |
| १९५१ | २८ | हैदराबादचा सुधारलेलीं बी-बियाणें व रोपें यांबाबत अधिनियम, १९५१. | सबंध. |
| | | ४. कच्छ अधिनियम. | |
| १९४९ | १५ | मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला, पूर्व पंजाबचा खतांच्या संरक्षणाबाबत अधिनियम, १९४९. | सबंध. |
| | | ५. मध्यप्रदेश अधिनियम. | |
| १९४९ | १० | मध्यप्रांत व वऱ्हाडचा निर्वासित इसमांची पुनर्वसाहत व पुनर्वसन (भू-संपादन) अधिनियम, १९४९. | सबंध. |
| १९४९ | ४३ | मध्यप्रांत व वऱ्हाडचा निर्वासित इसमांची पुनर्वसाहत व पुनर्वसन (घर बांधणी साहित्य संपादन) अधिनियम, १९४९. | सबंध. |
| १९५३ | १० | मध्यप्रदेश खादी विक्री अधिनियम, १९५३ ... ... | सबंध. |
| | | ६. सौराष्ट्र अधिनियम. | |
| १८२७ | विनियम १२. | सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ अन्वयें अनुकूल व लागू केलेला, मुंबईच्या अधीन असलेल्या जिल्ह्यांत सर्वत्र पोलीस पद्धति स्थापन करण्याबाबत, ती अंमलांत आणण्यासाठीं व नियमांची तरतूद करण्याबाबत आणि सर्व पोलीस अधिकाऱ्यांचीं व सेवकांचीं कर्तव्यें व अधिकार ठरविण्याबाबत विनियम. | सबंध. |
| १८२७ | २५ | सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ अन्वयें अनुकूल व लागू केलेला, राज्याच्या कारणांसाठीं, राज्याच्या कैद्यांना तुरुंगांत ठेवण्याबाबत व मुख्यांच्या जमिनी जप्त करण्याबाबत विनियम. | सबंध. |
| १८६७ | १६ | सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ अन्वयें अनुकूल व लागू केलेला हंगामी न्यायाधिशांबाबत अधिनियम, १८६७. | सबंध. |
| १९४९ | २२ | सौराष्ट्राचा राजकीय चळवळी (दंड परत करण्याबाबत) अध्यादेश, १९४८. | सबंध. |
| १९५० | १३ | सौराष्ट्राचा शिक्क्याबाबत अधिनियम, १९५० ... | सबंध. |
| १९५३ | ३९ | सौराष्ट्राचा मागासलेल्या वर्गासाठींच्या मंडळाबाबत अधिनियम, १९५३. | सबंध. |

## दुसरी अनुसूचि.

### सुधारलेले अधिनियम.

(कलम ३ पहा.)

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | जेथवर रद्द करण्यांत आला ती मर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | **१. केंद्रीय अधिनियम.** | |
| १८९८ | ५ | दंड प्रक्रिया संहिता, १८९८. | (१) कलम ४०६-ब यांत "४०६ किंवा" हे शब्द गाळण्यांत यावेत.<br>(२) अनुसूची २, भाग ४ मधील बाबी ८ व ११ गाळण्यांत याव्यात. |
| | | **२. मुंबई अधिनियम.** | |
| १९२३ | ६ | मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३. | कलम ११८-अ याच्या समास टीपेंत "१५" या आंकड्याऐवजीं, "पांच" हा शब्द दाखल करावा. |
| १९२५ | १८ | मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५. | कलम १८३, पोट-कलम (३) यांत, "पोट-भाडयानें दिली असेल" या मजकुराऐवजीं "भाडयानें दिली असेल" हा मजकूर दाखल करावा. |
| १९३६ | २० | मुंबईचा अफू ओढण्याबाबत अधिनियम, १९३६. | कलम २५ कंडिका (अ) मध्यें, "कमिशनर" या शब्दाऐवजीं "संचालक" हा शब्द दाखल करावा. |
| १९४७ | ६२ | मुंबईचा जमिनीच्या तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचें एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७. | कलम २, कंडिका (९ब) मध्यें,—<br>(१) उप-कंडिका (अ) मधील "आणि मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशांत, त्या प्रदेशास लागू केलेला तो अधिनियम" हा मजकूर गाळण्यांत यावा.<br>(२) उप-कंडिका (क) ऐवजीं पुढील उपकंडिका दाखल करावी :—<br>"(क) मुंबई राज्याच्या विदर्भ विभागांत व कच्छ प्रदेशांत, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग व कच्छ प्रदेश) अधिनियम, १९५८;" |

दुसरी अनुसूचि—चालू.

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | जेथवर रद्द करण्यांत आला ती मर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | **२. मुंबई अधिनियम—चालू.** | |
| १९५८ | ६५ | मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८. | तिसऱ्या अनुसूचीत, स्तंभ १ व २ मधील हैदराबाद महानगरपालिका अधिनियम, १९५५ (सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक २) या संबंधींच्या नोंदी गाळण्यांत याव्या. |
| | | **३. कच्छ अधिनियम.** | |
| १९२३ | ६ | मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३. | कलम ११८-अ याच्या समास टीपेंत "१५" या आंकड्याऐवजीं "पांच" हा शब्द दाखल करावा. |
| | | **४. सौराष्ट्र अधिनियम.** | |
| १९५२ | १० | सौराष्ट्र अधिनियमांबाबत (अर्थ विवरण) अधिनियम, १९५२. | कलम २ मध्यें, कंडिका (१२) नंतर, पुढील कंडिका दाखल करावी :— "(१२अ) 'कमिशनर' या संज्ञेचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ अन्वयें नेमलेला विभागाचा कमिशनर असा समजावा;". |
| १९५४ | २३ | सौराष्ट्राचा कर्जदार शेतकऱ्यांना साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९५४. | कलम ४१ मध्यें, कंडिका (१), उप-कंडिका (५) यांत, "पोट-कलम (१)" या मजकुराऐवजी "पोट-कलम (२)" हा मजकूर दाखल करावा. |

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.